नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 13/01/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## फसवणुक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर मौजा खानगाव शिवार येथे दिनांक 25/04/2018 चे 11.00 वा. ते दिनांक 25/09/2018 चे 16.00 पर्यंत आरोपी नामे– सूदर्शन बापूराव गुंजारकर, वय 54 वर्षे, रा. नागलवाडी त. हिंगणा जि.नागपुर याने फिर्यादी नामे– अरविंद बापुराव गुजांरकर, वय 50 वर्षे, रा. नागलवाडी त. हिंगणा जि. नागपुर व फिर्यादींच्या इतर नातेवाइकांच्या खोटया सहया करून नोटरी तयार केली. तसेच आरोपीने दोन मयत नातेवाईक हयात असल्याबाबत चे प्रमाणपत्र ग्राम अधिकारी धापेवाडा यांचे कडुन प्राप्त करून त्याआधारे वडीलोपार्जीत जमीनीतील 25 ते 30 वर्षा पूर्वी पासूनची जूनी 158 सागवन ची झाडे विक्री करून फिर्यादी व नातेवाईकांची कि. 4,00,000/–रू. ची फसवणुक केल्याचे व खोटे दस्तऐवज तयार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 21 कि.मि. मौजा बुटीबोरी ते रूईखैरी रोड वरील वेणा नदीवरील जुना पुल येथे दिनांक 13/01/2021 चे 11:13 वा. पुर्वी एम.एच–31/बीपीब–5749 क्रमांकाच्या हिरो होंडा स्प्लेंडरचा चालक आरोपी नामे– भगवंत वासु गजभे, वय 34 वर्ष, रा. कसर्ला पो. स्टे. डोंगरगाव नागभिड, जि. चंद्रपुर ह. मु. छोटी बोरी गाडीखाना त.जि. नागपूर याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगााने व निष्काळजीपणे बुटीबोरी ते रूईखैरी रोडवर चालवित असतांना वेणा नदीचे जुन्या पुलावर त्याचा नियंत्रण सुटल्याने तो तोल जाउन मोसाटरसायकल त्याचे अंगावर पडल्याने स्वतःचे मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कुलदिपसिंग लखनसिंग बावरी, वय 23 वर्ष, रा. वार्ड कं 3 रूईखैरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी आरती उघडे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर